## अमरावती महानगरपालिका, अमरावती
## दिनांक 25.4.2023 रोजी प्राप्त प्रशासकीय विषय

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक 79 -** अमरावती महानगरपालिका कर्मचारी वर्ग ४ व वर्ग ३ दिव्यांग यांना सर्वसाधारण सभा ठराव क्र.२५. दि.२०/०६/२०१७ कायम दि.२०/०६/२०१७ अन्वये मंजुर झालेल्या धोरणाप्रमाणे मनपा कर्मचारी श्री.हर्षद देविदास कुंडे (शिपाई) यांना निवासी वापराकरीता भुखंड देणेकरीता मंजुरी प्रदान करणेबाबत.

**ठराव क्रमांक 79 -** अमरावती महानगरपालिका कर्मचारी यांना महानगरपालिका मालकीचे भुखंड देणे संबंधातातील धोरण सर्वसाधारण सभा ठराव क्र. २५, दि.२०/०६/२०१७ व कायम दि.२०/०६/२०१७ अन्वये मंजुर झालेला आहे. त्या घोरणामधील अट क्र.१३ मध्ये मा.आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत आहे. या समितीमध्ये मा.उपायुक्त (प्रशा), सहा. आयुक्त-१, मुख्यलेखाधिकारी, मुख्यलेखापरिक्षक, सहायक संचालक नगर रचना व विधी अधिकारी हे सदस्य आहे. सदहु समितीची बैठक दि. ११/०४/२०२३ रोजी घेण्यात आली. उक्त बैठकीमध्ये खालील कर्मचारी यांना प्रचलित धोरणातील अटी व शर्तीप्रमाणे नमुद केलेल्या किमतीवर भुखंड देण्याची शिफारस करण्यात आली आहे.

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव | जागेचे वर्णन | क्षेत्र चौ.मी. | भुखंडाचे मुल्या ASR या दराच्या दिडपट |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. हर्षद देविदास कुंडे (शिपाई) सा.प्र.वि. | मौजा अकोली सर्व्हे क्र. ३१/१ भुखंड क्र. १०६ | १००.०० चौ.मी. | रु. ५,१०,०००/- |

मंजुर धोरणामधील अट क्र. २ मध्ये अर्जदार यांच्या वडीलांचा अर्ज व त्यांचे कोविड-१२ आजारामुळे झालेल्या मृत्यु इ. बाबी पाहता अट क्र. २ मध्ये उक्त समितीने सुट दिलेली आहे. महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ७९ ड प्रमाणे भुखंडाची मुल्य रु.५०,०००/- पेक्षा जास्त असल्याने सर्वसाधारण सभेची मंजुरी घेणे आवश्यक आहे. उक्त प्रस्तावास मा. आयुक्त यांनी दि. २४/०४/२०२३ रोजीला मंजुरी दिलेली आहे.

उपरोक्त प्रशासकीय विषय सर्वसाधारण सभेच्या मंजुरी करिता सादर करण्यात आला आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

**स्वा./-**
**नगरसचिव,**
**महानगरपालिका,अमरावती**

**स्वा./-**
**प्रशासक,**
**महानगरपालिका,अमरावती**

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती.